14 JUN 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उभारणार नर्सरी प्रकल्प

## व्यवस्थापन परिषद बैठकीत मान्यता; ६० विषयांवर चर्चा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ उद्यान विभागाच्या वतीने व्यावसायिक स्वरूपात नर्सरी प्रकल्प उभारण्यात येणार आहे. याच्या माध्यमातून १ लाख रोपे तयार केली जाणार आहेत. यास व्यवस्थापन परिषद बैठकीत मान्यता देण्यात आली.

व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत ६४ विषय होते. त्यामधील चार विषय फेरसादर करण्यात येणार आहेत. व्यवस्थापन परिषद बैठकीत रयत शिक्षण संस्थेच्या को-एज्युकेशनला (सह-अध्ययन) मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र शासन वर्ग-४ मधून ३ मध्ये कनिष्ठ सहायक पदावर काम करणाऱ्यांच्या वेतन संरक्षणास शासन मान्यता घेतली जाईल. त्यानंतरच त्यांचे



फिक्सेशन केले जाणार आहे. नॅकसाठी नथुबाई गरवारे कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.व्ही. कुलकर्णी यांची नॅक समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. परीक्षा विभागातील आयटी कक्षातील सॉफ्टवेअर प्रोग्रामर मानधनवाढीस मान्यता दिली गेली. करिअर ओरिएंटेड कोर्स अंतर्गत अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विशेष प्रमाणपत्र देण्याची शिफारस करण्यात आली. विद्यापीठातील सर्व अध्यासने एकत्रीकरणाचा अहवाल दुरुस्तीसह मान्य केला. प्रशासकीय सेवकांना सायकल खरेदीसाठी १० हजार रुपयांची रक्कम देण्यास मान्यता दिली.

### वाचन प्रेरणा दिन व्यापक स्वरूपात

माजी राष्ट्रपती ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. विद्यापीठातर्फे हा दिवस व्यापक स्वरूपात साजरा करण्यास व्यवस्थापन परिषद बैठकीत मान्यता मिळाली. या उपक्रमाची गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद करण्याचा प्रयत्न केला जाणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2024
तरुण भारत

# एकाच छताखाली येणार सर्व अध्यासन

▪ शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून पुरस्कार देण्यास मान्यता देण्यात आली. अध्यासनाचे धोरण ठरवण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने एका अध्यासनासाठी किमान दोन कोटी निधी मिळावा, या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. ज्या महाविद्यालयांना २५ वर्षे पूर्ण झाली अशा ८ महाविद्यालयांना अडीज लाख तर ५० वर्षे पूर्ण केलेल्या एका महाविद्यालयाला ५ लाख रूपयाच्या निधी देण्यास मान्यता दिली. तसेच विद्यापीठात नवीन इमारत बांधून सर्व अध्यासन एकाच छताखाली आणण्यास मान्यता देण्यात आली, हा निर्णय शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत झाला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तर सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेसमोर ६३ विषय मांडण्यात आले. त्यापैकी ३ विषय पुढच्या बैठकीला सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या. वर्ग चारमधून वर्ग तीनमध्ये कनिष्ठ सहाय्यकाला पदोन्नती देण्यास मान्यता. सेवानिवृत्त डॉ. आर. जी. कुलकर्णी यांची नॅक मूल्यांकनासाठी नियुक्ती करण्यात आली. सॉफ्टवेअर प्रोग्रॅमर मानधनावर घेण्याचा निर्णय. समितीने सादर केलेली व्याख्यानमाला व पुरस्कार नियमावली स्विकारण्यात आली. कोर्स इन डिप्लोमा लॅब, मेडीकल इन डिप्लोमा लॅबला स्वतंत्र सर्टीफिकेट देण्यास मान्यता. अध्यासनासाठी धोरण ठरवण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल स्विकारला. तर अध्यासनासाठी स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी जागा निवड समिती नेमण्यात आली. प्रशासकीय सेवकांना सायकल मंजूरीसाठी मानधन वाढवले.

चंद्रकांत हरी भोसले यांच्या आईच्या स्मृतीप्रित्यार्थ १ लाखाची रक्कम स्विकारली. एसआरपीडीच्या झेरॉक्स प्रतीच्या किंमतीत वाढ केली. १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यासाठी समिती स्थापना केली. आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्यात आली. हंगामी प्राध्यापकांना पाच वर्षाचा अनुभव ग्राह्य धरण्यास मान्यता. अजीवन विभागाचा वार्षिक अहवाल मान्य केला. व्यवसायिक नर्सरी प्रकल्पाला मान्यता दिली. वित्त व लेखा समितीची सिफारस स्विकारली. उम्रज कन्या महाविद्यालय व कडेगाव कन्या महाविद्यालयाला को–एज्युकेशनला मान्यता दिली. यासह अन्य विषयावर चर्चा करून मान्यता देण्यात आली.

14 JUN 2024
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ सुरू करणार रोपवाटिका

## व्यवस्थापन परिषदेची मान्यता; अध्यासनांच्या एकत्रिकरणासाठी नेमली समिती

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाकडून पर्यावरण संवर्धनाला बळ देणारे विविध उपक्रम सातत्याने राबविले जातात. याअंतर्गत आता नागरिकांना विविध रोपे उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाने रोपवाटिका सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच्या प्रस्तावाला आज व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली. विद्यापीठातील सर्व अध्यासने एकाच ठिकाणी सुरू करण्याबाबतच्या कार्यवाहीसाठी सात सदस्यीय समिती नेमली आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या आजच्या बैठकीसमोर एकूण ६४ विषय होते. त्यापैकी चार विषय फेरसादर करण्याची



सूचना यावेळी करण्यात आली. त्यामुळे ६० विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आला. विद्यापीठाच्या उद्यान विभागाने नागरिकांसाठी रोपवाटिका सुरू करण्याचा प्रस्ताव प्रशासनाला दिला होता. त्यावर चर्चा करून 'ना नफा-ना तोटा' तत्त्वावर रोपवाटिका सुरू करण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली. शासनाच्या मान्यतेनंतर वर्ग चारमधून वर्ग तीनमध्ये कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा निर्णय झाला. सेवानिवृत्त प्राचार्य आर. जी. कुलकर्णी यांची विद्यापीठाच्या 'नॅक' विभागाच्या समन्वयकपदी नियुक्ती करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या आयटी विभागातील कर्मचाऱ्यांना कामाच्या अनुभवानुसार मानधन देण्यास मान्यता देण्यात आली.

वाचन प्रेरणा दिवस व्यापक स्वरुपात साजरा करण्याच्या नियोजनासाठी सहा सदस्यीय समिती नेमण्यात आली. हंगामी तत्त्वावरील सहायक प्राध्यापकांना पाच वर्षांच्या अनुभवाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला. विद्यापीठातील व्याख्यान, पुरस्कारांबाबत समितीने दिलेला अहवाल स्वीकारण्यात आला.

### विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत कडक धोरण

■ या बैठकीत व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. [illegible], आर. व्ही. गुरव आणि [illegible] यांनी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती आणि महाविद्यालयांची घटती संख्या यामुळे शैक्षणिक दर्जा, गुणवत्तेवर परिणाम होत असून, त्याबाबत विद्यापीठाने गांभीर्याने विचार करण्याची मागणी केली. त्याबाबतचे पत्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना दिले. या मागणीच्या अनुषंगाने बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि शैक्षणिक गुणवत्ता कायम राखण्यासाठी कडक धोरण राबविण्याच्या अनुषंगाने पावले उचलण्याबाबत प्राथमिक स्वरूपात ठरविण्यात आले.

### 'सायकल'साठी आता १० हजार मिळणार

■ विद्यापीठातील प्रशासकीय सेवकांना सायकल खरेदीसाठी यापूर्वी वसुंधरा अभियानांतर्गत पाच हजार रुपये अग्रीम दिले जात होते. आता ही रक्कम १० हजार रुपये करण्यास बैठकीत मान्यता देण्यात आली. सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालयाला स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

14 JUN 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाकडून रायगडची स्वच्छता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने यावर्षी शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनाच्या ३०० स्वयंसेवकांनी रायगडावर स्वच्छता व प्लास्टिकमुक्ती करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शिवराज्याभिषेक दिन सोहळ्याच्या निमित्ताने रायगड स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक. सोबत सिद्धार्थ शिंदे, प्रा. अमोल कुलकर्णी, डॉ. के. एस. शिंदे आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने स्वयंसेवकांसह रायगड परिक्रमा शिवराजधानीची, किल्ले रायगड स्वच्छता मोहीम पार पाडली. इतिहास अभ्यासक डॉ. इंद्रजित सावंत यांनी विद्यार्थ्यांना राजधानी रायगड व छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास याबद्दल मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या यशस्वी मोहिमांबद्दल व महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती दिली. ५ जून रोजी शिवराज्याभिषेक दिनाच्या आदल्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी संपूर्ण रायगडची स्वच्छता केली. स्वच्छतेमध्ये ३०० बॅग प्लास्टिक व इतर कचरा संकलन तसेच फलकांद्वारे जनजागृती केली.

स्वयंसेवकांनी रायगडावर राज्याभिषेकदिनी मोफत अन्नछत्र दिलेल्या समितीचे सर्व साहित्य गडापासून रोपेपर्यंत पोहोचण्याच काम केले. शिबिरात कार्यक्रमाधिकारी प्रा. अमोल कुलकर्णी, डॉ. के. एस. शिंदे, प्रा. संदीप पाटील यांनी शिबिराचे संयोजन केले. मोहिमेस राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी भेट देऊन स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. ही मोहीम राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांच्या नेतृत्वाखाली झाली. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव, डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

14 JUN 2024 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाकडून रायगडची स्वच्छता मोहीम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त ३०० स्वयंसेवकांनी रायगडावर स्वच्छता व प्लास्टिकमुक्ती करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. विद्यापीठाच्या वतीने २ जून ते ८ जून या कालावधीत रायगड परिक्रमा शिवराजधानीची, किल्ले रायगड स्वच्छता मोहीम पार पाडण्यात आली. या मोहिमेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राविषयी स्वयंसेवकांना सविस्तर माहिती दिली. इतिहास अभ्यासक डॉ. इंद्रजित सावंत यांनी विद्यार्थ्यांना राजधानी रायगड आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास याबद्दल पुराव्यासह माहिती सांगितली.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी शिवाजी महाराजांच्या यशस्वी मोहिमांबद्दल आणि महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी केलेल्या कार्याबद्दल माहिती दिली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी संपूर्ण रायगडाची स्वच्छता केली. स्वच्छतेमध्ये ३०० बॅग प्लास्टिक संकलन व इतर कचरा संकलन त्याचबरोबर पर्यावरण रक्षणाबाबत घोषणा आणि फलकांद्वारे जनजागृती केली. निर्माण झालेला कचरा, तसेच प्लास्टिक संकलित करून ते रिसायकलिंगसाठी पाठवण्यात आले.

स्वयंसेवकांनी रायगडावर राज्याभिषेकदिनी मोफत अन्नछत्र दिलेल्या समितीचे सर्व साहित्य गडापासून रोप-वेपर्यंत पोहोचवण्याचे काम केले. यावेळी प्रा. अमोल कुलकर्णी, डॉ. के.एस. शिंदे, डॉ. क्षत्रिय, प्रा. संदीप पाटील व प्रा. मोरे यांनी शिबिराचे संयोजन केले.

या मोहिमेस राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी भेट देऊन स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी.एम. चौगले यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2024
सकाळ

# विद्यापीठातर्फे रायगडावर स्वच्छता मोहीम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीतर्फे शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त ३०० स्वयंसेवकांनी रायगडावर स्वच्छता करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. सुमारे ४५० पिशव्या प्लास्टिक संकलित केले. विद्यापीठातर्फे २ ते ८ जून दरम्यान ही मोहीम राबविली. संकलित कचरा रिसायकलिंगसाठी पाठविला. मोहिमेंतर्गत रायगडावरील राजसदर, होळीचा माळ, बाजारपेठ, जगदीश्वर मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीचा परिसरासह रोप वे व महादरवाजा ते चित्त दरवाजा परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. संचालक डॉ. टी. एम. चौगले यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छता मोहीम यशस्वी झाली. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव, डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे मोहिमेस प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 JUN 2024
लोकमत

# विद्यापीठात व्यावसायिक नर्सरी प्रकल्प सुरू होणार

## व्यवस्थापन परिषदेने दिली मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लवकरच व्यावसायिक नर्सरी प्रकल्प सुरू करण्यात येणार असून गुरुवारी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत याला मान्यता देण्यात आली. व्यवस्थापन परिषदेची बैठक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी विद्यापीठातील ३७ अधिविभागातील कंत्राटी प्राध्यापकांच्या भरतीलाही मान्यता देण्यात आली.

अध्यासनाचे धोरण ठरवण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने एका अध्यासनासाठी किमान दोन कोटी निधी मिळावा, या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. ज्या महाविद्यालयांना २५ वर्षे पूर्ण झाली अशा ८ महाविद्यालयांना अडीच लाख, तर ५० वर्षे पूर्ण केलेल्या एका महाविद्यालयाला ५ लाख रुपयांचा निधी देण्यास व विद्यापीठात नवीन इमारत बांधून सर्व अध्यासन एकाच छाताखाली आणण्यास मान्यता देण्यात आली.

उंब्रज (जि. सातारा)येथील रयत शिक्षण संस्थेचे महिला महाविद्यालय व कडेगाव महिला महाविद्यालयाच्या को-एज्युकेशन प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. विद्यापीठातील एसआरपीडी यंत्रणेतून परीक्षेसाठी महाविद्यालयाला पाठवल्या जाणाऱ्या प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्सचे दर ५० पैशांवरून एक रुपया करणे, प्रशासकीय सेवकांना सायकल खरेदीसाठी मिळणाऱ्या अग्रीममध्ये वाढ करणे याला या बैठकीत मान्यता देण्यात आली.

वाचन प्रेरणा दिन भव्य साजरा करण्यासही मान्यता देण्यात आली असून ज्या महाविद्यालयांमधील तुकड्यांना प्रतिसाद मिळत नाही अशा तुकड्या बंद करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्यासह सदस्य उपस्थित होते.



### याला मिळाली मान्यता

- व्यवस्थापन परिषदेसमोर ६३ विषय मांडण्यात आले. त्यापैकी ३ विषय पुढच्या बैठकीला सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.
- वर्ग चारमधून वर्ग तीनमध्ये कनिष्ठ सहायकाला पदोन्नती देणे, सॉफ्टवेअर प्रोगामर मानधनावर घेणे, कोर्स इन डिप्लोमा लॅब, मेडिकल इन डिप्लोमा लॅबला स्वतंत्र सर्टिफिकेट देणे, आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुदतवाढ, हंगामी प्राध्यापकांना पाच वर्षांचा अनुभव ग्राह्य धरणे याला मान्यता देण्यात आली.



- यावेळी अध्यासनासाठी स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी जागा निवड समिती नेमण्यात आली. आजीवन विभागाचा वार्षिक अहवाल मान्य केला. शिवाय डॉ. आर. जी. कुलकर्णी यांची नॅक मूल्यांकनासाठी नियुक्ती करण्यात आली.